**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १५

**सभावृत्तांत**

**दिनांक – २८/०२/२०२०** **वेळ – दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षीक सभा **शुक्रवार** दिनांक **२८/०२/२०२०** रोजी **दुपारी ३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.तुषार रघुनाथ हिंगे - सभापती**
२. मा.अभिषेक गोविंद बारणे
३. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
४. मा.सागर बाळासाहेब गवळी

या शिवाय मा.खोत – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.पानसरे- क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.४) मनपा क्रीडा धोरणात खेळाडु दत्तक योजनेतील अटी शर्ती मध्ये दुरुस्ती करणेबाबत- मा.अभिषेक बारणे , मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) मनपा परिसरातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी खेळाडूंना सन २०१८-१९ या वर्षाची क्रीडा शिष्यवृत्ती सन २०१९-२० या वर्षात अदा करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता घेणेबाबत. – मा.सागर गवळी , मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) टेबल टेनिस सेंटर चालविण्यास देणेबाबत. – मा.विकास डोळस , मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) विविध प्रभागात ओपन जिम साहित्याचे ठिकाणी नावाचे फलक बसविणेबाबत. – मा.विकास डोळस , मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) बॅडमिंटन कोर्ट जिल्हास्तरीय आणि त्यावरील खेळाडूंना मिळणेबाबत. – मा.विकास डोळस, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) व्यायामशाळेमध्ये बसवावयाचे इनडोअर साहित्याच्या वाढीव खर्चास मान्यता देणे व वाढीव साहित्य् खरेदीस मंजूरी देणेबाबत.- मा.विकास डोळस , मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) सेक्टर २६ येथील जिम/(जागा) जिमकरीता चालवणे देणेबाबत.- मा.विकास डोळस , मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.११) १) सेक्टर २५ विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील व्यायाम शाळा चालवण्यास देण्याबाबत २) सेक्टर २८ येथील कै.संजय काळे मैदानाजवळील क्लब हाऊस भाडयाने चालवण्यास देणेबाबत. ३) सेक्टर २६ येथील जिम/जागा जिमकरीता चालवणेस देणेबाबत. – मा.विकास डोळस , मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१२) मनपाचे आ.टी.आय इमारत कासारवाडी येथील व्यायामशाळेबाबत. – मा.विकास डोळस , मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१३) ओपन जिम करुन मिळणेबाबत. – मा.विकास डोळस , मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक - मा.अभिषेक बारणे                    अनुमोदक - मा.सागर गवळी

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची शुक्रवार दिनांक २८/०२/२०२० ( दुपारी ३.०० वा.) ची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक १३/०३/२०२० रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती** – शनिवार दिनांक १३/०३/२०२० रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **तुषार रघुनाथ हिंगे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १५

**सभावृत्तांत**

**(** दिनांक २८/०२/२०२० (दु.३.००वा) ची तहकूब सभा **)**

दिनांक – **१३/०३/२०२०** वेळ - दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा,कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक **२८/०२/२०२०** ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक १३/०३/२०२० रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.तुषार रघुनाथ हिंगे - सभापती**
२. मा.अभिषेक गोविंद बारणे
३. मा.बाबासाहेब(बाबा) त्रिभुवन
४. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
५. मा.सागर बाळासाहेब गवळी

या शिवाय मा.खोत – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.पानसरे- क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक – ८० विषय क्रमांक – ०१
दिनांक – १३/०३/२०२० विभाग - क्रीडा
सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक– मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/११६/२०२० दि.१०/०२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.स्थायी समिती सभा सदस्य ठराव क्र.६३०५ दि.०८/०१/२०२० अन्वये मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/०३/कावि/५३/२०२० दि.१५/०१/२०२० अन्वये प्रभाग क्र.२१ येथील नवमहाराष्ट्र व्यायामशाळा हि मैत्री स्वयंरोजगार सेवा संस्था पिंपरीगाव या संस्थेस दि.०२/०३/२०१९ ते दि.०१/०२/२०२० या कालावधीकरिता र.रू.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळेची मुदत दि.०२/०३/२०२० रोजी संपुष्टात येत आहे. प्रभाग क्र.२१ येथील नवमहाराष्ट्र व्यायामशाळा हि मैत्री स्वयंरोजगार सेवा संस्था पिंपरीगाव या संस्थेस दि.०३/०२/२०२० पासून पुढे ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रू.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देण्यास मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबत मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

ठराव क्रमांक – ८१ विषय क्रमांक – ०२
दिनांक – १३/०३/२०२० विभाग - क्रीडा
सुचक – मा.विकास डोळस अनुमोदक– मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/११७/२०२० दि.१०/०२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.स्थायी समिती सभा सदस्य ठराव क्र.६३०४ दि.०८/०१/२०२० अन्वये मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचेकडील आदेश क्रमांक क्रीडा/०३/कावि/५४/ २०२० दि.१५/०१/२०२० अन्वये प्रभाग क्र.२१ येथील कै.दशरथ कापसे व्यायामशाळा हि मैत्री स्वयंरोजगार सेवा संस्था पिंपरीगाव या संस्थेस दि.०२/०३/२०१९ ते दि.०१/०२/२०२० या कालावधीकरिता र.रू.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळेची मुदत दि.०२/०३/२०२० रोजी संपुष्टात येत आहे. प्रभाग क्र.२१ येथील कै.दशरथ कापसे व्यायामशाळा हि मैत्री स्वयंरोजगार सेवा संस्था पिंपरीगाव या संस्थेस दि.०३/०२/२०२० पासून पुढे ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रू.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देण्यास मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबत मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

ठराव क्रमांक – ८२ विषय क्रमांक – ०३
दिनांक – १३/०३/२०२० विभाग - क्रीडा
सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक– मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/६१४/२०२० दि.१५/०२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने व साई संस्कार संस्था, चिंचवड, पुणे १९ यांच्या सहकार्याने सन २०१९-२० मध्ये श्री स्वामी विवेकानंद क्रीडांगण, महात्मा फुलेनगर, चिंचवड येथे मतिमंद व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या स्पर्धा २०१९-२० आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रू.९,४१,०००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख एक्केचाळीस हजार फक्त) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सहभागी शाळांना भेट वस्तू, मेडल्स खरेदी ,पी.व्हि.सी.फ्लेक्स बॅनर्स व स्पर्धा काळात विद्यार्थी खेळाडू, पंच अल्पोपहार व भोजन इ.खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करून करणेस तसेच विद्युत स्पीकर, माईक, जनरेटर व्यवस्था खर्च हा विद्युत विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय व स्टेज, मंडप, टेबल खुर्च्या व्यवस्था खर्च हा स्थापत्य विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातुन खर्ची टाकणेस मान्यता देणे व स्पर्धा अनुषंगाने क्रीडा विभागाचा होणारा र.रू.७,७६,०००/- हा खर्च क्रीडा विभागाचे क्रीडा निधी - म.न.पा.तर्फे आयोजित विविध क्रीडा स्पर्धा, खेळाडू विद्यार्थ्यांना सकस आहार या लेखाशिर्षातुन खर्ची टाकणेस मान्यता देणेबाबत मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ८३ विषय क्रमांक – ०४

दिनांक – १३/०३/२०२०

सुचक – मा. अभिषेक बारणे अनुमोदक– मा.विकास डोळस

संदर्भ – मा.अभिषेक बारणे , मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव

मा.अभिषेक बारणे, मा.विकास डोळस यांनी प्रस्तावित केलेनुसार मनपा क्रीडा धोरणात खेळाडू दत्तक योजनेत खालील अटी शर्तीचा समावेश करावा.

१) खेळाडू मनपा शाळेत प्रवेश घेतला असल्यास मागील २ वर्षे मनपा शाळेचा विद्यार्थी असावा.

२) मनपा शाळेत गेली २ वर्षापासुन असल्याचे संबंधित मुख्याध्यापक यांची शिफारस घेण्यात यावी हे पत्र ग्राहय धरण्यात यावे.

वरीलप्रमाणे अटी व शर्ती मध्ये दुरुस्ती करुन मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

ठराव क्रमांक – ८४ विषय क्रमांक – ०५

दिनांक – १३/०३/२०२०

सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक– मा.विकास डोळस

संदर्भ – मा. सागर गवळी , मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव

मा.सागर गवळी, मा.विकास डोळस यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील क्रीडा विभागाच्या वतीने दरवर्षी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती अदा केली जाते. मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१ दि.१८/१/२०१४ अन्वये क्रीडा विभाग क्रीडा धोरण मंजूर झाले असून सदर धोरणामध्ये भाग १ ड शिष्यवृत्ती मधील(१) पान क्रमांक १४ मनपा परिसरातील विद्यार्थी खेळाडूंसाठी शालेय क्रीडा शिष्यवृत्ती योजना शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी व संघटनेमार्फत खेळणा-या खेळाडूंना प्रोत्साहन मिळून मनपा परिसरातील जास्तीत जास्त, राज्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार होण्याच्या दृष्टीने राज्यस्तर खेळाडूस र.रु.३०००/-त्यात १०% वाढ करुन र.रु.३३००/- तसेच असोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्ससिटी तर्फे आयोजित आंतरविद्यापीठ(राष्ट्रीय) स्तरावर सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूस वार्षिक र.रु.३३००/- त्यात १०% वाढ करुन र.रु.३३००/- व राष्ट्रीय शालेय स्पर्धात (नॅशनल स्कूल गेम/स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया) तर्फे आयोजित राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूस वार्षिक र.रु.५०००/- त्यात १०% वाढ करुन र.रु.५५००/- या प्रमाणे क्रीडा शिष्यवृत्ती अदा करणेकामी मान्यता दिलेली आहे. सन २०१८-१९ या सालाकरीता शिष्यवृत्ती अदा करणेकामी वृत्तपत्रात प्रेसनोट प्रसिध्द करुन संबंधित विद्यार्थ्यांकडून दि.२८/८/२०१९ ते ३०/९/२०१९ पर्यंत अर्ज मागविले होते. त्यानुसार १३५ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १३ अर्ज हे क्रीडा शिष्यवृत्ती धोरणात बसत नसल्यामुळे अपात्र करण्यात आलेले आहेत. उर्वरीत(प्रमाणपत्रे) अर्ज १) ६७ अर्ज प्रमाणपत्रे पडताळणी करुन घेणेकामी जिल्हा क्रीडा अधिकारी,पुणे २) ३ अर्ज प्रमाणपत्रे विद्यापीठ क्रीडा मंडळ,पुणे यांचेकडे पाठविले होते. क्रीडा व युवक सेवा संचालनालय,पुणे ४९ यांनी पत्र क्र.क्रीयुसे/पिंचिंमनपाप्रमाणपत्रपड/१८-१९/का-४ दि.२२/०३/२०१९ या अन्वये सदर प्रमाणपत्रे ही सहा.आयुक्त क्रीडा यांचे स्तरावर School Game Fedration of India या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या निकालावरुन छाणनी करुन घेणेत यावे असे कळविले होते. त्यानुसार संबंधित संकेतस्थळावरुन तपासणी केली असता ५० खेळाडू पात्र आहेत. २ खेळाडूंचे खेलो इंडीयाचे प्रमाणपत्र

आहेत. खेळाडूंच्या प्रमाणपत्रांची तपासणी करुन एकूण १३५ अर्जातील प्रमाणपत्रांपैकी १२० विद्यार्थी खेळाडूंचे अर्ज मनपाच्या क्रीडा धोरणानुसार पात्र ठरविण्यात आले आहे. या स्पर्धेचे असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| पात्र/अपात्र | राज्यस्तर | आंतरविद्यापीठ | राष्ट्रीयस्तर | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| पात्र | ६७ | ३ | ५० | १२० | ----- |
| अपात्र | ९ | ० | ४ | १३ | ---- |
| निर्णय राखून ठेवण्यात येत आहे | ० | ० | २ | २ | खेला इंडया (खालील दिलेले आहे.) |
| **एकूण** | **७६** | **३** | **५६** | **१३५** | |

खेलो इंडीया खेळलेल्या २ खेळाडूंचे प्रमाणपत्राबाबत क्रीडा व युवक सेवा संचालनालय,पुणे यांच्याकडे फोनद्वारे विचारणा केली असता त्यांनी ह्या स्पर्धेसाठी संबंधित वयोगटानुसार ऐच्छीक खेळाडूंना निवड चाचणी साठी बोलवून त्यातून संघ निवडला जातो. त्यामुळे सदर खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती देणेबाबतचे अधिकार आपल्या स्तरावर घेण्यात यावा असे कळविले आहे. मनपा क्रीडा धोरणामध्ये खेलो इंडिया या स्पर्धेचा समावेश नसून या २ खेळाडूंना शिष्यवृत्तीचा लाभ देणेबाबत वरिष्ठ पातळीवर निर्णय घेणे आवश्यक आहे. व उर्वरीत १२० खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्तीचा लाभ देण्यास हरकत वाटत नाही. तरी सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता १२० विद्यार्थी खेळाडूंना खालीलप्रमाणे इतकी शिष्यवृत्ती रक्कम अदा करावी लागणार आहे. त्यास मान्यता देणेस सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता १२१ विद्यार्थी खेळाडूंना खालीलप्रमाणे इतकी शिष्यवृत्ती रक्कम अदा करावी लागणार आहे. त्यास मान्यता देणेस

| अ.क्र. | स्पर्धेचा स्तर | प्रत्येक शिष्यवृत्ती र.रु. | एकूण खेळाडू | एकूण शिष्यवृत्ती र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | राज्यस्तर | ३३००/- | ६७ | २२११००/- |
| २ | आंतरविद्यापीठ | ३३००/- | ३ | ९९००/- |
| ३ | राष्ट्रीय | ५५००/- | ५० | २७५०००/- |
| | | एकूण | १२० | ५०६०००/- |

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाची क्रीडा शिष्यवृत्ती बक्षिसे ही सन २०१९-२० आर्थिक वर्षात देय असून सदर लेखा शिर्षावर र.रु.०६,७७,४००/- तरतूद शिल्लक असून या लेखाशिर्षावर सदर क्रीडा शिष्यवृत्ती बील र.रु.५,०६,०००/- खर्ची टाकता येणे शक्य आहे. तरी मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१ दि.१८/१/२०१४ अन्वये क्रीडा विभाग क्रीडा धोरण मंजूर झाले असून सदर धोरणामध्ये भाग १ ड शिष्यवृत्ती मधील(१) पान क्रमांक १४ मनपा परिसरातील विद्यार्थी खेळाडूंसाठी शालेय क्रीडा शिष्यवृत्ती योजना शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी व संघटनेमार्फत खेळणा-या खेळाडूंना प्रोत्साहन मिळून मनपा परिसरातील जास्तीत जास्त राज्य,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार होण्याच्या दृष्टीने शिष्यवृत्ती अदा केली जाते. खेलो इंडियाचे खेळाडू यांना क्रीडा शिष्यवृत्ती अदा करण्याचे धोरण नसल्यामुळे याबाबत निर्णय होईपर्यंत त्याचा निर्णय राखून ठेवणेस व सन २०१८-१९ या वर्षात १२० पात्र विद्यार्थी खेळाडूंना एकूण क्रीडा शिष्यवृत्ती र.रु.५,०६,०००/-(अक्षरी र.रु.पाच लाख सहा हजार फक्त) अदा करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीसभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

ठराव क्रमांक – ८५ विषय क्रमांक – ०६

दिनांक – १३/०३/२०२०

सुचक – मा.विकास डोळस अनुमोदक– मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव

मा.विकास डोळस, मा.अभिषेक बारणे यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मुरलीधर माचुत्रे व्यायामशाळा चिंचवड येथे टेबल टेनिस सेंटर आहे. व संत तुकारामनगर येथे सरदार वल्लभाई पटेल टेबल टेनिस सेंटर आहे. असे वरील २ टेबल टेनिस सेंटर मनपाचे आहेत. पिंपरी चिंचवड टेबल टेनिस असोसिएशन हे गेली ५ वर्ष पिंपरी चिंचवड शहरामध्ये टेबल टेनिस संदर्भात चांगले काम करीत आहे. मनपाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण देणार आहेत. पिंपरी चिंचवड शहरातील नविन विकसित झालेले वरील २ टेबल टेनिस सेंटर खेळाचा वापर व प्रसार होण्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड टेबल टेनिस असोसिएशन यांना चालविण्यास देणेबाबत मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

ठराव क्रमांक – ८६ विषय क्रमांक – ०७

दिनांक – १३/०३/२०२०

सुचक – मा.विकास डोळस अनुमोदक– मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव

मा.विकास डोळस, मा.अभिषेक बारणे यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्रीडा विभागामार्फत विविध विविध प्रभाग ओपन जिम साहित्य बसविणेत आले आहे. सदर ओपन जिम साहित्य ज्या-ज्या ठइकाणी बसविलेले आहे, त्या प्रभागातील ४ नगरसदस्य व मा.सभापती, क्रीडा कला, साहित्य व सांस्कृतिक समिती यांचेशी समन्वय साधून सदर ओपन जिमला विशिष्ट नाव देऊन त्याचा फलक लावणे व सदर फलकावर मा.सभापती, क्रीडा कला, साहित्य व सांस्कृतिक समिती व संबंधित ४ नगरसदस्य ( फलकावर मा.सभापती, क्रीडा कला, साहित्य व सांस्कृतिक समिती व मा.नगरसदस्य याचे नाव देणे) यांच्या प्ररणेतून- असे फलक स्थापत्य उद्यान विभाग यांचे मार्फत तयार करून संबंधित ठिकाणी बसवून देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

ठराव क्रमांक – ८७ विषय क्रमांक – ०८

दिनांक – १३/०३/२०२०

सुचक – मा.विकास डोळस अनुमोदक– मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव

मा.विकास डोळस, मा.अभिषेक बारणे यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे शहरात बरेच बॅडमिंटन कोर्ट उपलब्ध आहेत. सदर बॅडमिंटन कोर्ट ऑनलाईन बुकींगद्वारे दिले जातात. पुणे जिल्हा टिममध्ये असे काही खेळाडू आहेत की ज्यांना बॅडमिंटन कोर्टची गरज आहे. त्यांना ऑनलाईन कोर्ट मिळतेच असे नाही. आयटीतील तरूण हे कोर्ट बुकींग करून ठएवतात. सध्या खेळणा-या जिल्हा स्तरीय खेळाडूंसाठी त्यांच्या सोईच्या वेळेत ऑफलाईन कोर्ट देण्याची व्यवस्था करावी. सर्वात जास्त गरज त्या खेळाडूंना आहे. आपल्या शहरातील खेळाडूंना कोर्ट मिळाल्यामुळे ते राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्राविण्य मिळवतील. तरी आपल्या शहरातील

जिल्हास्तर व त्यावरील खेळाडूंना त्यांच्या सोईनुसार ऑफलाईन कोर्ट बुकींगची व्यवस्था करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

ठराव क्रमांक – ८८ विषय क्रमांक – ०९

दिनांक – १३/०३/२०२०

सुचक – मा.विकास डोळस अनुमोदक– मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव

मा.विकास डोळस, मा.अभिषेक बारणे यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१९-२० करीता विविध व्यायामशाळां करीता एकूण ९ ठिकाणी असलेल्या व्यायामशाळांमध्ये अद्ययावत स्वरूपाचे इनडोअर साहित्य खरेदी करणेकामी र.रू. १,१०,००,०००/- च्या खर्चास मा. क्रीडा कला, साहित्य व सांस्कृतिक समिती मा.सदस्य ठराव क्र.९२ दिनांक २५/२/२०१९ अन्वये मान्यता घेणेत आली आहे. सदर कामी मध्यवर्ती भांडार विभागाने ई- निविदा प्रसिध्द केली असून याकामी साहित्याचे स्पेसिफिकेशन मध्ये बदल झाल्यामुळे ९ ठिकाणचे इनडोअर व्यायामशाळा साहित्य खरेदी करणेकामी खर्चामध्ये वाढ झालेली आहे. मध्यवर्ती भांडार विभागाचे ई निविदेनुसार एकूण र.रू. १,२२,९२,३३५/- इतका खर्च येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रशासकीय इमारतीकरीता अद्ययावत स्वरूपाचे र.रू. १३,६५,८१५/- चे इनडोअर साहित्य खरेदी करणेकामी क्रीडा विभागामार्फत मध्यवर्ती भआंडार विभागाकडे मागणी करण्यात आलेली असल्याने सदर खर्चाचा विचार करून यापूर्वीच्या र.रू. १,१०,००,०००/-च्या मंजूर असलेल्या खर्चात वाढ करुन र.रू.१,४०,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेकामी व ९ ठिकाणचे इनडोअर साहित्य खरेदी करण्याबरोबर मनपा प्रशासकीय इमारतीमधील व्यायामशाळे करीता अद्ययावत स्वरूपाचे इनडोअर साहित्य खरेदी करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

ठराव क्रमांक – ८९ विषय क्रमांक – १०

दिनांक – १३/०३/२०२०

सुचक – मा.विकास डोळस अनुमोदक– मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव

मा.विकास डोळस, मा.अभिषेक बारणे यांनी प्रस्तावित केलेनुसार कु.स्नेहा कासले या अर्बन हेल्थ नावाने जिम चालवितात. त्यांची M.Sc. in Nutrtion and Diabetic मध्ये डिग्री झालेली असून त्यांनी झुंबा व अरोबिक्स मध्ये मास्टर केलेले आहे. सेक्टर २६ येथे टेनिस कोर्टाच्या मागील बाजूस असलेले ०२ छोटे हॉल त्यांना नाममात्रे भाडेदराने देणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

ठराव क्रमांक – ९० विषय क्रमांक – ११

दिनांक – १३/०३/२०२०

सुचक – मा.विकास डोळस अनुमोदक– मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव

मा.विकास डोळस, मा.अभिषेक बारणे यांनी प्रस्तावित केलेनुसार से.२५ विठ्ठल रखुमाई मंदिरातील दुस-या मजल्यावरील व्यायामशाळा खूप दिवसापासून रिकामी आहे. ती व्यायामशाळा साई प्रतिष्ठाण

प्रणित साई सेवा संस्था, प्राधिकरण यांना भाडे तत्वावर चालविण्यास देण्यास तसेच से.२८ येथिल कै. संजय काळे मैदाना जवळील क्लब हाऊस बरेच दिवसापासून बंद आहेत. किरण क्रीकेट क्लब यांचे क्रीकेट नेट प्रॅक्टीस याच मैदानात चालू आहे. तरी वरील क्लब हाऊस यांना भाड्याने चालविण्यास देणेस तसेच कु.स्नेहा कासले यांना सेक्टर २६ येथे टेनिस कोर्टाच्या मागे ०२ छोटे हॉल असलेने नाममात्र भाडयाने देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

ठराव क्रमांक – ९१ विषय क्रमांक – १२

दिनांक – १३/०३/२०२०

सुचक – मा.विकास डोळस अनुमोदक– मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव

मा.विकास डोळस, मा.अभिषेक बारणे यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मालकीची व्यायामशाळा आयटीआय इमारत कासारवाडी येथे आहे. सदर व्यायामशाळेतील व्यायाम साहित्य दोन स्वतंत्र खोल्यामध्ये ठेवणेत आलेले असून सदरची व्यायामशाळा खाजगी संस्थेला सेवा शुल्क तत्वावर चालविण्यास देण्यात आलेचे समजते. परंतू सदरच्या दोन्ही स्वतंत्र खोल्यात ठेवणेत आलेले व्यायाम साहित्यासह व्यायामशाळा ही फक्त महिलांसाठी चालविण्यास देणेत आलेचे समजते. परंतू सद्यस्थित सदरचे महिला व्यायामशाळेस महिलांचा अत्यंत अल्प प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येते. त्यामुळे ह क्षेत्रिय कार्यालयातील महिला कर्मचा-यांकरिता सदर व्यायामशाळेपैकी महिला व्यायामशाळा सकाळी/ सायंकाळचे वेळेत उपलब्ध करुन द्यावी. तसेच माझ्याकडे ह क्षेत्रिय कार्यालयाकडील पुरूष अधिकारी/ कर्मचारी यांनी सध्या अस्तित्वास असलेल्या व्यायामशाळांपैकी एक व्यायामशाळा व्यायामासाठी उपलब्ध करुन देणेबाबत मागणी केलेली आहे. त्यामुळे सदरचे दोन्ही खोल्यात कार्यरत असलेल्या व्यायामशाळेपैकी आरोग्य विभागाचे बाजूस असलेली व्यायामशाळा ही ह क्षेत्रिय कार्यालयातील पुरूष अधिकारी/ कर्मचारी यांच्या करिता अद्ययावत व्यायाम साहित्यासह चालू करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

ठराव क्रमांक – ९२ विषय क्रमांक – १३

दिनांक – १३/०३/२०२०

सुचक – मा.विकास डोळस अनुमोदक– मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव

मा.विकास डोळस, मा.अभिषेक बारणे यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.१५ मधील सेक्टर नं.२४ व २५ येथिल नागरिकांच्या मागणीनुसार सेक्टर नं.२४ मधील कबीर उद्यान व सेक्टर नं.२५ मधील सोमेश्वर उद्यान येथे प्रभागातील नागरिकांकरिता वर नमुद केलेल्या ठिकाणी ओपन जिम तातडीने बसविणेकामी मान्यता देणेत येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( तुषार रघुनाथ हिंगे )**
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१५३/२०२०
दिनांक : १३/०३/२०२०



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.